आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२९ जुलै २०२४ -सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रताप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची अजित पवार आणि त्यांच्या सोबतच्या आमदारांना नोटीस

- दिव्यांगांसाठी एकाच छताखाली प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय सहायता या सर्व सुविधा देणारं पुनर्वसन केंद्र सर्व महापालिकांनी सुरू करावं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

- जातीआधारित जनगणना करण्याची, तसंच शेतकऱ्यांना किमान आधारभूत दराची कायदेशीर हमी देण्याची लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी

- मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख यांचं निधन

**आणि**

- मुंबईची जिया राय ठरली इंग्लिश खाडी सर्वात कमी वेळात पार करणारी जगातली सर्वात कमी वयाची दिव्यांग जलतरणपटू

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस अपात्रता प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं आज अजित पवार आणि त्यांच्या सोबत असलेल्या आमदारांना नोटीस बजावली आहे. शरद पवार यांनी विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. उद्धव ठाकरे यांनीही अशाच प्रकारची याचिका सादर केली आहे. दोन्ही याचिकांवर सर्वोच्च न्यायालय एकाचवेळी निर्णय घेणार आहे. या नोटीशीला उत्तर

आल्यानंतर याचिका सुनावणीसाठी घ्यायच्या किंवा नाही हे सर्वोच्च न्यायालय ठरवणार आहे.

**<><><><><>**

दिव्यांगांसाठी एकाच छताखाली प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय सहायता या सर्व सुविधा देणारं पुनर्वसन केंद्र सर्व महापालिकांनी सुरू करावं, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. ते आज मुंबईत दिव्यांग कल्याण महामंडळाच्या बैठकीत बोलत होते.

दिव्यांगांना कौशल्य विकासाचं प्रशिक्षण देणारी योजना तयार करतानाच, त्यांच्यासाठी कर्जाची मर्यादा ५० हजारावरुन अडीच लाख रुपयांपर्यंत वाढवावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्यातल्या दिव्यांगांना यंदाही रोजगार, स्वयंरोजगारासाठी ई-रिक्षा वाटप करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला. गेल्या वर्षी महामंडळानं बॅटरीवर चालणाऱ्या ७९७ रिक्षा दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी मंजूर केल्या. त्यापैकी ६०० रिक्षांचं वाटप केलं असून, यावर्षी देखील ६६७ रिक्षा खरेदी करण्यासाठी आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. १०० टक्के दिव्यांगत्व असलेल्यांना रिक्षा वाटपासाठी प्राधान्य दिलं जात असल्याचं दिव्यांग कल्याण सचिवांनी यावेळी सांगितलं.बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातलं सरकार कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत जागरूक नाही अशी टीका विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केली. नवी मुंबईत घडलेल्या घटनेसंदर्भात चर्चा करण्यासाठी दानवे यांनी आज नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांची भेट घेतली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. राज्यात

महिलांवरच्या अत्याचारांच्या घटना वाढल्यानं त्यांच्यात असुरक्षिततेची भावना असल्याचं ते म्हणाले. सर्वत्र लाडकी बहिण योजनेचा गवगवा केला जात आहे पण राज्यातल्या बहिणी सुरक्षित नाहीत, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेने यावर्षी सहा हजार कोटींच्या निविदा काढल्या, मात्र गेल्यावर्षी निविदा काढलेलं एकही काम झालेलं नसून पालिका पैशांची उधळपट्टी करत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केला. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. मागच्या वर्षी निविदा काढलेली किती कामं पूर्ण झाली, ज्या कंत्राटदारांना दंड ठोठावण्यात आला होता तो आकारण्यात आला का, असा सवालही ठाकरे यांनी विचारला. काळ्या यादीत टाकलेल्या कंत्राटदारांना पालिकेनं काम दिल्याचा आरोपही त्यांनी केला. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर आपण सर्वांची कामांची चौकशी करणार असून दोषींवर कारवाई करणार असल्याचं ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नुकत्याच पार पडलेल्या आषाढी वारीत सहभागी झालेल्या राज्यभरातल्या पंधराशे दिंड्यांना सानुग्रह अनुदानापोटी ३ कोटी रुपये प्रदान करण्यात आले असल्याची माहिती शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अध्यक्ष ह.भ.प. अक्षय महाराज भोसले यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. या दिंड्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी २० हजार वर्ग करण्यात आल्यामुळं वारकऱ्यांमध्ये आनंदाचं वातावरण असल्याचं भोसले महाराज यावेळी म्हणाले. आजच्या परत वारीच्या पार्श्वभूमीवर संबंधित दिंडी प्रमुखांच्या वतीनं भोसले यांनी शासनाचे आभार मानले. वारकऱ्यांना

सोयी-सुविधा पुरवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या अभूतपूर्व निर्णयांमुळं यंदाचा आषाढी वारीचा सोहळा सर्वार्थानं आनंददायी ठरला, असंही भोसले म्हणाले.

**<><><><><>**

जातीआधारित जनगणना करावी आणि किमान आधारभूत किंमतीची कायदेशीर हमी शेतकऱ्यांना द्यावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केली. इंडिया आघाडीचं सरकार आल्यास या दोन्ही गोष्टी करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. केंद्रीय अर्थसंकल्पात देशाच्या लोकसंख्येच्या ७३ टक्के असलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी काहीच तरतुदी नसल्याचा आरोप त्यांनी केला. पेपरफुटीचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला. तत्पूर्वी, केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठीची तरतूद सातत्यानं कमी केल्याचा आरोप समाजवादी पक्षाच्या डिंपल यादव यांनी केला. भाजपाचे खासदार सुरेश कुमार कश्यप यांनी अर्थसंकल्पाची प्रशंसा केली. हा अर्थसंकल्प देशाला नवी दिशा देईल आणि देशाला आत्मनिर्भर करेल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

शल्यविशारद, बालरोगतज्ञ आणि मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख यांचं आज सकाळी मुंबईत निधन झालं. त्या पंचाऐंशी वर्षांच्या होत्या. गर्भसंस्कार, नवजात शिशू तसंच माता यांच्या आहारासंदर्भात त्यांनी महत्वपूर्ण काम केलं आहे. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणून १९९५ मध्ये त्यांची नियुक्ती झाली. कुलगुरुपदाच्या आपल्या कारकिर्दीत त्यांनी विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांच्या आईचं नावही नमूद करण्यासारखे महत्वाचे निर्णय घेतले.

**<><><><><>**

मुंबईची जिया राय, इंग्लिश खाडी सर्वात कमी वेळात पार करणारी जगातली सर्वात कमी वयाची दिव्यांग जलतरणपटू ठरली आहे. जिया हिनं हे ३४ किलोमीटरचं अंतर २८ आणि २९ जुलैदरम्यान १७ तास, २५ मिनिटांमध्ये पार केलं.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये आज नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीत पुरुष गटात अर्जुन बबुता आणि महिला गटात रमिता जिंदल यांना पदक मिळवण्यात अपयश आलं. अंतिम क्रमवारीत रमिता सातव्या स्थानावर तर अर्जुन चौथ्या स्थानावर राहिल्याने त्याचं पदक थोडक्यात हुकलं. बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी ही जोडी पुढच्या फेरीत गेली. त्यांचा सामना उद्या इंडोनेशियाच्या फजर अल्फीयान आणि मुहम्मज रियान अर्डिअंटो या जोडीशी होईल.

आज पुरुष हॉकीत भारत आणि अर्जेंटीनामधला सामना बरोबरीत सुटला. सामन्याच्या सुरुवातीला अर्जेंटीनाने भारतावर 1-0 अशी आघाडी घेतली, मात्र नंतर भारताच्या चमूने अर्जेंटीनाशी बरोबरी केली. पुढच्या फेरीत भारताचा सामना आयर्लंडबरोबर होईल.

**<><><><><>**

जागतिक बाजारांमधली तेजी आणि परदेशी निधीचा ओघ या पार्श्वभूमीवर देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळी गाठली मात्र दिवसअखेर ती टिकवण्यात अपयश आलं. बाजार उघडल्यापासून असलेली तेजी दुपारी वाढली आणि सेन्सेक्सनं ८१ हजार ९०८ अंकांचा आणि निफ्टीनं सुमारे २५ हजारांच्या पातळीला स्पर्श केला. सेन्सेक्स पावणे सहाशे आणि निफ्टी १६५ अंकांनी वधारला होता. मात्र त्यानंतर सुरू झालेल्या नफेखोरीनं दोन्ही निर्देशांक घसरले. दिवसअखेर

सेन्सेक्स २३ अंकांनी वधारून ८१ हजार ३५६ आणि निफ्टी १ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ८३६ वर बंद झाला.

**<><><><><>**

**राज्यात आजही अनेक ठिकाणी पाऊस सुरु आहे.**

**चंद्रपूर** जिल्ह्यात सततच्या पावसामुळे नदी, नाले, तलाव तुडुंब भरले असून जिल्ह्यातल्या इराई धरणाचे सातही दरवाजे उघडले आहेत. धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्यामुळे प्रशासनानं नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पावसामुळे जनजीवन विस्कळित झालं असून अनेक मार्ग बंद झाले आहेत.

**धुळे** जिल्ह्यातही पहाटेपासून संततधार पाऊस कोसळत आहे. जिल्ह्यातल्या हतनुर धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाल्यानं आज सकाळी धरणाचे १० दरवाजे पूर्ण क्षमतेने उघडण्यात आले असून तापी नदी पात्रात विसर्ग करण्यात आला आहे. प्रशासनानं तापी काठावरच्या गावातल्या नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात कोकणात तसंच घाट विभागात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**